मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# पिंपरी-चिंचवडमधील तापमानात घट होणार! 'डेन्स फॉरेस्ट'...

## महापालिका राखीव भूखंडांवर 'डेन्स फॉरेस्ट' अर्थात घनदाट जंगले विकसित करून दोन लाख वृक्षारोपण करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या राखीव भूखंड परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील निवडक ठिकाणी घनदाट जंगल (डेन्स फॉरेस्ट) विकसित करण्याची संकल्पना राबविण्यात येणार असल्याची माहिती; महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.



महापालिकेतर्फे पर्यावरण संवर्धन, शहरात हरित क्षेत्र वाढ आणि नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने निगडी प्राधिकरणातील गणेश तलाव, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानात आयोजित बैठकीत आयुक्तांनी ही माहिती दिली. महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नगरसेवक अमित गावडे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता सुनील पवार यावेळी उपस्थित होते.

'घनदाट जंगल विकसित केल्यास शहरातील हरित क्षेत्रात मोठी वाढ तर तापमानात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी महापालिका विविध उपक्रम प्रभावीपणे राबवत आहे', असेही आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले.

'वाढते शहरीकरण आणि बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरण संतुलन राखणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे. महापालिका नागरिकांना रोपे, खत व आवश्यक तांत्रिक सहकार्य करेल. शहरात पुढील काळात तब्बल दोन लाख वृक्षारोपणाचा मानस आहे. त्यासाठी विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग घ्यावा', असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले.

### स्वच्छ, हरित शहर योजना

**» भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'स्वच्छ व हरित पिंपरी-चिंचवड शहर योजना' लवकरच सुरू करण्यात येणार आहे. ही योजना महापालिका आणि लोकसहभागातून यशस्वी करण्यात येईल, असे महापौर रवी लांडगे यांनी जाहीर केले.**

# यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पिंपरी चिंचवडच्या कबीर कांबळे यांचा पत्रकारांकडून सन्मान

## कबीर राहुल कांबळे यांनी 125 वा क्रमांक मिळवून आयएफएस (वनसेवा) साठी निवड झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

कबीर राहुल कांबळे यांनी देशातील सर्वोच्च परीक्षा, केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), उत्तीर्ण करून पिंपरी चिंचवड शहराला गौरव मिळवून दिला आहे. त्यांनी 125 वा क्रमांक मिळवून आयएफएस (वनसेवा) साठी निवड झाली आहे. पिंपरी चिंचवडच्या पत्रकारांनी काल महानगरपालिका इमारतीच्या पत्रकार कक्षात श्री. कांबळे यांचे भव्य स्वागत केले. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची एक पुस्तक, एक शाल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी उपस्थित असलेल्या त्यांच्या आई-वडिलांचाही सत्कार करण्यात आला.



यावेळी ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब ढसाळ, संतलाल यादव, बाबू कांबळे, अविनाश कांबीकर, दादाराव आढाव, दिलीप देहाडे, भिमराव बरकडे,युनूस खतिब आणि इतर अनेक पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित होते. ज्येष्ठ समाजसेवक मारुती भापकर आणि युवराज दखले हे ही उपस्थित होते आणि त्यांनी कांबळे यांना यश व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि अविरत अभ्यासातून मिळवलेल्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा अभिमान वाढला असून, कबीर राहुल कांबळे शहरातील तरुणांसाठी प्रेरणास्थान बनला आहे.

ज्येष्ठ पत्रकार संतलाल यादव यांनी आपले विचार व्यक्त केले आणि कबीर कांबळे व त्यांच्या पालकांचे या यशाबद्दल अभिनंदन केले. त्यांनी शहरातील तरुणांना प्रेरणा देण्यासाठी परीक्षेची तयारी, कोचिंग आणि अभ्यासासाठी वापरलेल्या पुस्तकांविषयी सविस्तर माहिती देण्याचे विनंती केले. मारुती भापकर, युवराज दाखले आणि बाळासाहेब ढसाळ यांनी गरीब, शोषित आणि वंचितांचा आवाज बनून, न्यायासाठी काम करून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वप्ने साकार करण्यासाठी सूचना दिल्या. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, माजी पालिका अधिकारी शांताराम भोंडवे यांचे सुपुत्र संकेत भोंडवे (आयएएस) आणि काळेवाडीचे माजी नगरसेवक सुरेश नाढे पाटील यांचे सुपुत्र विक्रम सुरेश नढे (आयएफएस) यांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून शहराला गौरव मिळवून दिला आहे.

# प्रभाग समिती निर्णयावरून महापालिकेची माघार

## कायद्याशी सुसंगत प्रशासनासाठी आदेश मागे; सर्वसाधारण सभेत मुद्द्यांवर खुली चर्चा करून निर्णयात सुधारणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कारभारातील गोंधळ पुन्हा एकदा समोर आला असून, प्रभाग समित्यांची संख्या ८ वरून १० करण्याच्या निर्णयावरून सर्वसाधारण सभेत मोठा वाद निर्माण झाला. दोन दिवसांपूर्वी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अधिकृत स्वाक्षरीने जारी केलेला आदेश अखेर रद्द करण्याची वेळ प्रशासनावर आली. या प्रकारामुळे सत्ताधारी आणि प्रशासनाची सभागृहात चांगलीच फजिती झाली.

भाजप सत्तेत आल्यानंतर शहरात दोन नवीन प्रभाग समित्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार प्रशासनाने १० क्षेत्रीय कार्यालये स्थापन करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. हा निर्णय २५ मे २०२६ पासून लागू होणार असल्याचे आदेश आयुक्तांनी काढले होते. मात्र, शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यांनी हा निर्णय कायद्याशी विसंगत आणि बेकायदेशीर असल्याचा मुद्दा उपस्थित केला.

उबाळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रशासकीय खर्च कपातीच्या आवाहनाचा उल्लेख करत, अतिरिक्त कार्यालये उभारण्याचा निर्णय अनावश्यक आर्थिक बोजा वाढवणारा असल्याची टीका केली. त्यानंतर सभागृहात जोरदार राजकीय वाद रंगला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत, "राष्ट्रवादीचा प्रभाग अध्यक्ष होऊ नये म्हणून हा दिखाऊ निर्णय घेतला गेला," असा आरोप केला. शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनीही वाढीव कार्यालयांचा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली.

सभागृहातील वाढता गदारोळ लक्षात घेऊन महापौर रवि लांडगे यांनी अखेर पूर्वीचा ठराव आणि आयुक्तांचा आदेश रद्द करण्यात आल्याची घोषणा केली. त्यामुळे प्रशासनाला माघार घ्यावी लागली.




### प्रभाग समिती निर्णयावर पुनर्विचार

» पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रभाग समित्यांची संख्या वाढविण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करत आदेश मागे घेतला. सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी कायदेशीर मुद्दे उपस्थित केल्यानंतर प्रशासनाने तत्काळ दखल घेत सुधारित भूमिका घेतली. या प्रक्रियेमुळे निर्णय घेण्यामध्ये पारदर्शकता आणि कायदेशीर अंमलबजावणीचे महत्त्व अधोरेखित झाले. प्रशासनाने पुढील काळात कोणताही निर्णय घेताना नियमांची अधिक काटेकोर पडताळणी करण्याचे संकेत दिले आहेत. सभागृहात विविध पक्षांच्या सदस्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडल्याने लोकशाही पद्धतीने चर्चा होऊन निर्णय प्रक्रियेला दिशा मिळाल्याचे चित्र दिसून आले.

### सभागृहात लोकशाहीची प्रभावी झलक

» महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत विविध पक्षांच्या नगरसेवकांनी प्रभाग समिती निर्णयावर जोरदार चर्चा केली. विरोधी आणि सत्ताधारी सदस्यांनी आपापली मते मांडत प्रशासनाकडून स्पष्टीकरण मागितले. चर्चेनंतर महापौरांनी निर्णय रद्द झाल्याची माहिती देत सभागृहात स्पष्टता निर्माण केली. या प्रक्रियेमुळे लोकशाही व्यवस्थेत सभागृहाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले. नियमांनुसार निर्णय व्हावेत आणि प्रशासन अधिक जबाबदारीने काम करावे, यासाठी सर्व सदस्यांनी एकमुखाने भूमिका घेतल्याचे दिसून आले. यामुळे भविष्यातील प्रशासनिक निर्णय प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### प्रशासनाकडून तत्पर सुधारणा

» प्रभाग समित्यांच्या वाढीबाबत काढलेला आदेश वादाच्या भोवऱ्यात सापडल्यानंतर महापालिका प्रशासनाने तातडीने निर्णय बदलला. त्यामुळे चुकीची प्रक्रिया पुढे जाण्यापूर्वीच थांबविण्यात यश आले. आयुक्त आणि प्रशासनाने परिस्थितीची गंभीर दखल घेत आदेश मागे घेतल्याने नागरिकांमध्येही सकारात्मक संदेश गेला आहे. प्रशासनातील विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुढील निर्णय प्रक्रियेत अधिक समन्वय आणि कायदेशीर सल्ला घेण्यावर भर देण्याचे संकेत दिले. या घटनेमुळे भविष्यातील कामकाज अधिक शिस्तबद्ध आणि उत्तरदायी पद्धतीने करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# विद्यानगर येथील चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोर शिक्षा द्या

## आमदार अमित गोरखे यांची मागणी, चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यानगर परिसरात एका ८ वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे.

या घटनेबाबत आमदार गोरखे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, "निष्पाप चिमुकलीवर झालेला अत्याचार हा अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार आहे. शहरात अशा विकृत प्रवृत्ती डोके वर काढत असतील, तर त्यांना वेळेतच ठेचून काढणे ही सर्वांची जबाबदारी आहे," असे म्हटले आहे.



दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास वेगाने सुरू केला असून आरोपी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला तात्काळ ताब्यात घेऊन बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. आरोपीच्या विकृत कृत्याचा विचार करता, कायद्याच्या चौकटीत राहून त्याला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कटिबद्ध असल्याचेही गोरखे यांनी स्पष्ट केले.

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विद्यानगर परिसरात तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच, "पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळवून द्यावा. जोपर्यंत पीडितेला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमचा पाठपुरावा सुरू राहील," असे आश्वासन आमदार अमित गोरखे यांनी दिले. विद्यानगर परिसरात एका ८ वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे.

# महापालिकेच्या प्रशासनात अनुभवी अधिकाऱ्यांचा सहभाग वाढला

## प्रतिनियुक्तीवरील 32 अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाला मिळतेय अधिक समन्वय आणि कार्यक्षमता; विकासकामांना गती देण्यावर भर

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढत असल्याने स्थानिक अधिकाऱ्यांच्या अधिकारांबरोबरच पदोन्नतीच्या संधींवरही परिणाम होत असल्याची चर्चा प्रशासनात सुरू झाली आहे. सध्या महापालिकेत तब्बल ३२ शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असल्याची माहिती प्रशासनाने सर्वसाधारण सभेत लेखी उत्तराद्वारे दिली.

नगरसेविका दीपाली डोख यांनी महापालिकेत किती शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत, तसेच काही अधिकारी आदेशानंतरही अन्य ठिकाणी रुजू होत नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या उत्तरानुसार, महापालिकेत एक महापालिका आयुक्त, तीन अतिरिक्त आयुक्त, दहा उपायुक्त,अकरा सहाय्यक आयुक्त, एक मुख्य लेखापरीक्षक, एक आरोग्य प्रमुख, एक शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग), एक प्रशासकीय अधिकारी, एक उपसंचालक नगर रचना, एक नगर रचनाकार आणि एक प्रशासन अधिकारी असे एकूण ३२ अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.

महापालिकेतील उपायुक्तांच्या एकूण १८ पदांपैकी नऊ पदे शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांसाठी राखीव असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात सध्या दहा उपायुक्त कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे महापालिकेच्या सेवेतील अधिकाऱ्यांना पदोन्नती आणि महत्त्वाच्या पदांवरील संधी कमी होत असल्याची भावना प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे अतिरिक्त आयुक्त पदांपैकी किमान एक पद महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सेवा ज्येष्ठता आणि बढतीच्या आधारावर मिळणे अपेक्षित असताना, सध्या तीनही अतिरिक्त आयुक्त हे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी आहेत. त्यामुळे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बढतीची संधी हुकल्याची चर्चा प्रशासनात रंगली आहे.

दरम्यान, काही अधिकारी विशिष्ट विभागातच कार्यरत राहण्यासाठी प्रयत्न करतात आणि आदेशानंतरही अन्य विभागात रुजू होत नाहीत, असा मुद्दाही सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. मात्र, प्रशासनाने हे आरोप फेटाळून लावत सर्व अधिकारी महापालिका आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार नियुक्त ठिकाणी कार्यरत असल्याचे स्पष्ट केले आहे.




### प्रशासनाचा आरोपांवर खुलासा

» **काही अधिकारी विशिष्ट विभागातच कार्यरत राहण्यासाठी प्रयत्न करतात आणि बदली आदेशानंतरही नवीन ठिकाणी रुजू होत नाहीत, असा मुद्दा सर्वसाधारण सभेत उपस्थित करण्यात आला होता. मात्र प्रशासनाने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. सर्व अधिकारी महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसारच नियुक्त ठिकाणी काम करत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनाच्या नियमांनुसार करण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले.**

### प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची संख्या

» **महापालिकेच्या प्रशासनात सध्या तब्बल ३२ शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. यामध्ये एक आयुक्त, तीन अतिरिक्त आयुक्त, दहा उपायुक्त, अकरा सहायक आयुक्त, मुख्य लेखापरीक्षक, आरोग्य प्रमुख, शिक्षणाधिकारी, नगर रचनाकार यांसारख्या पदांचा समावेश आहे. प्रशासनाने सर्वसाधारण सभेत लेखी उत्तराद्वारे ही माहिती दिली. प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची संख्या वाढत असल्याने स्थानिक अधिकाऱ्यांच्या बढतीच्या संधींवर परिणाम होत असल्याची भावना प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे.**

### बढतीच्या संधींवर परिणाम

» **महापालिकेतील अतिरिक्त आयुक्तांची तिन्ही पदे सध्या शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांकडे आहेत. सेवा ज्येष्ठता आणि कामगिरीच्या आधारे स्थानिक अधिकाऱ्यांना या पदांवर बढती मिळावी, अशी अपेक्षा होती. मात्र प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या संधी कमी झाल्याची चर्चा प्रशासनात सुरू आहे. उपायुक्तांच्या पदांबाबतही अशीच स्थिती असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे महापालिकेतील अधिकाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.**

---

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात पुण्यातील अध्यापिका अटकेत

## 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातील जीवशास्त्राची अध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरेला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केली.

**पुणे | प्रतिनिधी**

'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातील जीवशास्त्राची अध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरेला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केली. मांढरे परीक्षा प्रक्रियेशी (एनटीए) संबंधित आहे. पेपरफुटी प्रकरणात सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर मांढरेला अटक करण्यात आली, अशी माहिती 'सीबीआय' कडून देण्यात आली. मनीषा मांढरे परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे.

या प्रकरणात त्यांची दिल्लीत चौकशी करण्यात आली. त्यानंतर तिला अटक करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने तिचा वनस्पतिशास्त्र, तसेच प्राणिशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिकांशी संबंध होता. या प्रकरणात बिबवेवाडीतील ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आली आहे. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मांढरेला घरी बोलावले होते. तेथे मांढरेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती दिली. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर मांढरेला अटक करण्यात आली, अशी माहिती 'सीबीआय' कडून देण्यात आली.

'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून शुक्रवारी अटक केली. कुलकर्णी रसायनशास्त्राचा अध्यापक आहे. कुलकर्णी हा परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. पेपरफुटी प्रकरणात तो सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. कुलकर्णीची 'सीबीआय' च्या पथकाने चौकशी केली. चौकशीत मांढरेही या प्रकरणात सामील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर 'सीबीआय' ने तिला अटक केली. 'नीट' पेपरफुटी प्रकरणात 'सीबीआय' ने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून धनंजय लोखंडे (वय २६) याला ताब्यात घेतले. लोखंडे हा पुण्यातील काही जणांच्या संपर्कात असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर बिबवेवाडी परिसरात ब्यूटी पार्लर चालविणारी मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी बुधवारी (१३ मे) ताब्यात घेतले.



### वाघमारेच्या पतीची चौकशी

» **या प्रकरणात अटक करण्यात आलेली आरोपी मनीषा वाघमारेचा पती दंतवैद्य आहे. त्याचे बिबवेवाडीत रुग्णालय आहे. 'सीबीआय' च्या पथकाने वाघमारेच्या पतीच्या रुग्णालयाची पाहणी केली. रुग्णालय बंद असल्याचे निदर्शनास आले. वाघमारेच्या डॉक्टर पतीची या प्रकरणात 'सीबीआय' कडून चौकशी करण्यात येणार आहे.**

# ऊस नियंत्रण आदेश 2026 मध्ये सुधारणा; साखर उद्योगाच्या महत्त्वाच्या मागण्या

## खांडसरी व गूळ उद्योगांना कायद्याच्या कक्षेत आणण्याची मागणी; एफआरपी व साखर दर धोरणात बदलाची अपेक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने प्रस्तावित ऊस नियंत्रण आदेश 2026 अंतर्गत सुधारणा करताना देशपातळीवर प्रति दिन 100 मे.टनाइतक्या क्षमतेचे खांडसरी उद्योगासह गूळ उत्पादन, गूळ पावडर उत्पादकांनाही कायद्याच्या कक्षेत आणावे, यांसह ज्या वर्षीची एफआरपी त्याच वर्षीचा साखर उतारा विचारात घेण्यात यावा,

अशी महत्वपूर्ण मागणी केंद्र सरकारकडे साखर उद्योगाच्यावतीने करण्यात येणार असल्याची माहिती नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुण्यातील एका हॉटेलात शनिवारी (दि.16) महासंघाची महत्वपूर्ण बैठक झाली. त्यास 55 ते 60 कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या बैठकीस माजी सहकार मंत्री व व्हीएसआयचे उपाध्यक्ष आमदार दिलीप वळसे पाटील, जयप्रकाश दांडेगांवकर, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, पृथ्वीराज जाचक, महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांच्यासह कर्नाटक, गुजरात आणि उत्तरप्रदेशमधील प्रतिनिधीही उपस्थित होते.

त्यानंतर सायंकाळी पत्रकार परिषदेत झालेल्या निर्णयांची माहिती त्यांनी दिली.

राज्यातील ऊस गाळप हंगामाचे दिवस 85 ते 90 दिवसांपर्यंत खाली आले असून गुऱ्हाळघरांकडूनही प्रतिदिन पाचशे मे.टनाइतके ऊस गाळप केले जाते. शेवटी ऊस उत्पादक शेतकरी केंद्रबिंदु मानूनच धोरणात्मक निर्णय व्हायला हवेत. केंद्राने प्रस्तावित कायदा बदलावर 20 मेपुर्वी सूचना-हरकती मागविल्या असून आम्ही आजच्या बैठकीतील निर्णयानुसार निवेदन देणार असल्याचेही पाटील यांनी सांगितले.

### प्रस्तावित कायद्यात अपेक्षित बदलाची मागणी

- » उसाची रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) उशिराने दिल्यास व्याजाचा दर हा 12 टक्के असावा.
- » देशपातळीवर दोन साखर कारखान्यांमधील हवाई अंतराची नवीन साखर कारखाना उभारण्यासाठीची अट 25 किलोमीटर ठेवावी.
- » साखरेचा दर आणि इथेनॉलचा दरही हा उसाच्या एफआरपीशी निगडित ठेवावा.
- » साखरेसाठी द्विस्तरीय किंमत धोरण हवे. ग्राहकांसाठी एक दर आणि व्यापारी वापरासाठी स्वतंत्र दर असावेत.
- » साखर उद्योगाचा कोणताही निर्णय हा या क्षेत्रात अग्रणी असलेल्या शिखर संस्थांशी विचार-विनिमय करुन घेण्यात यावा.

### साखर उद्योगाच्या प्रमुख मागण्या

» केंद्र सरकारच्या प्रस्तावित ऊस नियंत्रण आदेश २०२६ मध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याची मागणी साखर उद्योगाकडून करण्यात आली आहे. देशभरातील खांडसरी उद्योग, गूळ उत्पादन आणि गूळ पावडर उत्पादकांनाही कायद्याच्या कक्षेत आणावे, अशी भूमिका महासंघाने मांडली. तसेच एफआरपी निश्चित करताना त्याच वर्षाचा साखर उतारा विचारात घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊनच धोरणात्मक निर्णय व्हावेत, यावर बैठकीत भर देण्यात आला. केंद्र सरकारने २० मेपूर्वी सूचना आणि हरकती मागवल्या असून महासंघाकडून सविस्तर निवेदन पाठविण्यात येणार आहे.

### बैठकीत विविध राज्यांचा सहभाग

» पुण्यात झालेल्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या बैठकीला महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरात आणि उत्तरप्रदेशमधील साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत ऊस गाळप हंगामाचा कालावधी कमी होत असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. गुऱ्हाळघरांमधून मोठ्या प्रमाणावर ऊस गाळप होत असल्याने उद्योग क्षेत्रासमोर नवे आव्हान निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी निर्णयांची माहिती दिली. शेतकरी हित, उद्योग स्थैर्य आणि पारदर्शक धोरण यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

---

# पुण्यात इंधनाचा तुटवडा की फक्त अफवा ? पेट्रोल-डिझेल असोसिएशनकडून मोठा खुलासा

## इंधन बचतीच्या आवाहनानंतर नागरिकांमध्ये गोंधळाचे वातावरण; गरजेपेक्षा जास्त खरेदीमुळे पेट्रोल कंपन्यांच्या पुरवठा साखळीवर प्रचंड ताण.

**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केल्यानंतर इंधनाची टंचाई निर्माण होण्याच्या शक्यतेने नागरिक धास्तावले आहेत. यामुळे वाहनांची टाकी फुल्ल केली जात आहे, यातून अचानक वाढलेल्या मागणीमुळे पेट्रोल कंपनीच्या लोणी काळभोर येथील डेपोवर टँकर भरण्यासही वेळ लागत असल्याने पेट्रोल पंपावर टँकर पोहचण्यास विलंब होत आहे.




यामुळे पंपावर रांगा लागत आहेत, पुरवठा विस्कळीत झाल्याने काही ठिकाणी पेट्रोल संपल्याचे फलकही दिसू लागले आहेत. पेट्रोल, डिझेल बाबत अफवा पसरत असल्याने वाहन चालक- मालक गाड्यांच्या टाक्या भरून ठेवत आहेत. एकाएकी गरजेपेक्षा अधिक पेट्रोल, डिझेलची खरेदी होत असल्यामुळे मागणीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी पंप चालकांचीही मागणी वाढली आहे.

डेपो येथेही गाड्या भरण्यास रांगा आहेत. तेथून गाडी भरून पोहचण्यास विलंब होत आहे. त्यामुळे भरलेली गाडी पंपावर पोहचेपर्यंत पंप बंद ठेवावा लागत आहे. काही पंपावर वाहनांच्या रांगा कायम आहेत. इंधन बचतीच्या आवाहानाचा प्रारंभीचा काळ असल्यामुळे ग्राहकांत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

हळुहळू गोंधळाची स्थिती निवळल्यानंतर पुन्हा वाढलेली मागणी घटेल. असा अंदाजही पेट्रोल, डिझेल असोसिएशनचे पदाधिकारी व पंप चालक व्यक्त करत आहेत. पेट्रोल, डिझेलच्या दरात आणखी वाढ होणार किंवा घट होणार याबाबत कोणताच अंदाज व्यक्त करता येत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### पेट्रोल संपल्याचे फलक का ?

» इंधनाची टंचाई नाही. मात्र, शहरासह जिल्ह्यातून सर्वत्र एकदम मागणी वाढली आहे. त्यामुळे पेट्रोलियम कंपन्यांना गाड्या भरण्यास विलंब होत आहे. परिणामी भरलेली गाडी पंपावर पोहचण्यास उशीर होत आहे. त्यामुळे काही वेळा पंप चालक इंधन संपल्याचे फलक लावत आहेत. अशा फलकामुळे वाहनचालकांत गोंधळ निर्माण होत आहे. टंचाईची कोणतीही स्थिती नसल्याने वाहनचालकांनी गोंधळू नये, असे आवाहन पेट्रोलियम कंपन्या व पंप चालकांनी केले आहे.